# प्रेस नोट ता. २६/०७/२०२१

## रेकी करुन ज्वेलरी शॉप/बॅका फोडणाऱ्या टोळीच्या ०५ सदस्यांना गुन्हे शाखा युनिट- ४, पिंपरी चिंचवड कडुन अटक

### १२ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

यातिल प्रकरणाची हकिगत अशी की, जगदंबा ज्वेलर्स शॉप नं.२, गीतांजली अपार्टमेंट, हुतात्मा चौक, बावधन बुा ता.मुळशी, पुणे या ज्वेलरी शॉप चे बाजुचे दुकान दि. १५/०६/२०२१ रोजी काही इसमांनी चायनिजचा व्यवसाय करण्यासाठी भाडयाने घेतले होते. दि. १८/०६/२०२१ रोजी नेहमीप्रमाणे सकाळी सदर ज्वेलरी शॉप चे मालकाने स्वतःचे दुकाण उघडले तेव्हा त्यांना दुकानात चोरी झाल्याचे व चोरट्यांनी शेजारील चायनिज चे दुकाणातुन पोटमाळ्यावरील भिंतीला भगदाड पाडुन आत प्रवेश करुन गॅस कटरने तिजोरी फोडण्याचा प्रयत्न केला परंतु तिजोरी न फुटल्याने दुकानातील वर ठेवलेले चांदीचे दागिने, लॅपटॉप, मोबाईल फोन व सी.सी.टी.व्ही डिव्हीआर असा एकुण ०३,५५,०००/- रु कि. चा मुद्देमाल चोरुन नेल्याचे कळाल्याने सदर बाबत **हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-४३३/२०२१ भा.द.वि कलम- ४५४,४५७,३८०** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने व त्याची पद्धत वेगळी असल्याने **मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, श्री. कृष्ण प्रकाश सो,** यांनी सदर गुन्हा हा पुढील तपासकामी गुन्हे शाखा युनिट ४ कडे वर्ग करुन आम्हाला सदर गुन्ह्याबाबत स्वतः लक्ष घालुन गुन्हा उघडकीस आणणे बाबत आदेशित केले होते.

त्यानुसार सदर गुन्हा हा गुन्हे शाखा युनिट ४ कडे वर्ग केलेनंतर आमचे मार्गदर्शनाखाली **सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. प्रशांत अमृतकर, गुन्हे शाखा युनिट-४ पिंपरी चिंचवड चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहा. पोलीस निरीक्षक सिद्धनाथ बाबर व स्टाफ** यांनी तातडीने सदर गुन्हयाचा कसोशीने तपास सुरु करुन घटनास्थळाचे आजुबाजुचे परिसरातिल सीसीटीव्ही कॅमे-यांची तपासणी व इतर तांत्रिक विश्लेषन सुरु केले. तसेच सदर गुन्ह्यात स्थानिक परिसरात काम करणारे नेपाळी वॉचमन सामिल असण्याची दाट शक्यता असलेने आजुबाजुचे परिसरात राहणारे सर्व वॉचमन ची माहिती काढणे सुरु केले. तेव्हा केलेल्या तांत्रिक विश्लेषणात मारुंजी हिंजवडी परिसरात वॉचमन म्हणुन काम करणारा एक इसम सदर गुन्ह्यात सामिल असलेबाबत संशय आल्याने व तो सदर घटना झालेपासुन काम सोडुन गेल्याचे कळाल्याने त्याचेवरिल संशय बळावला. त्याचेबाबत आणखी कसुन तपास केला असता तो अंबरनाथ जि.ठाणे परिसरात वास्तव्यास असलेबाबत माहिती मिळाल्याने एका पथकाने अंबरनाथ येथे जावुन त्याचा शोध घेवुन दि. १२/०७/२०२१ रोजी सदर वॉचमन नामे **जगत बम शाही वय- २८ वर्षे मुळ रा.क्रिस्टल पॅलेस,क्रिष्णा कॉलनी मारुंजी पुणे मुळ रा. गाव गैटाडा, विनायक नगरपालिका, जि. अच्छम नेपाळ** यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करुन त्याचे साथिदार नामे **१) गणेश विष्णु शाही वय- ३३ वर्षे मुळ रा. गाव भुरुआ, लम्की टिकापुर रोड,जि.कैलासी नेपाळ २) खगेंद्र दोदी कामी वय- २७ वर्षे मुळ रा. घाटगाऊ, चौगुने गाव पालिका जि. सुरखेत नेपाळ, ३) प्रेम रामसिंग टमाटा वय- ४२ वर्षे सध्या रा.पद्मालय पार्क, लंडन ब्रिज जवळ पुनावळे पुणे मुळ रा. कालेकांडा,विनायक नगरपालिका, जि. अच्छम नेपाळ** यांना ठाणे शहरातुन वेगवेगळया ठिकाणांवरुन ताब्यात घेवुन त्यांचेकडुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला.

सदर आरोपींकडे केलेल्या तपासात त्यांनी सदरचा गुन्हा हा त्यांचे साथिदार पाहिजे आरोपी नामे १) शंकर चंद्र उर्फ कांचा लामा, रा- धनगढी नेपाळ २) अर्जुन उर्फ ओम रावल, रा- धनगढी नेपाळ ३) बादल लामा, रा- धनगढी नेपाळ तसेच शंकर चंद्र उर्फ कांचा लामा याचे झारखंड येथुन बोलावलेले ०३ साथिदार यांचेसह इनोव्हा गाडीचालक अटक आरोपी नामे **रईस कादर खान, वय- ५२ वर्षे, रा- तीन डोंगरी, प्रेम नगर, उन्नत नगर रोड क्र.२ साईबाबा मंदीर समोर, गोरेगाव (पश्चिम) मुंबई** यांचेसह केल्याचे निष्पण्ण झाले आहे. त्यांचेकडुन आतापर्यंत एकुण १२,०३,९४०/- रु कि. चा मुद्देमाल ज्यात १७१९ ग्रॅम चांदीचे व ११ ग्रॅम सोन्याचे दागिणे तसेच चोरी करतांना वापरलेली इनोव्हा कार तसेच ०१ मोटारसायकल, मोबाईल फोन जप्त करण्यात आली आहे.

**सदर प्रकरणात अटक आरोपी नामे गणेश शाही व पाहिजे आरोपी नामे शंकर चंद्र उर्फ कांचा लामा, रा- धनगढी नेपाळ हे मुख्य सुत्रधार असुन त्यांनी चोरी करण्याकरिता सोनाराचे शेजारिल दुकाण भाड्याने घेता येईल अश्या ब-याच ठिकाणांची पाहणी करुन सांगवी पोलिस स्टेशन हद्दीतिल एक व बावधन येथिल एक सोनाराचे दुकाण बघुन ठेवले होते. त्यानंतर बावधन येथिल सोनाराचे दुकाणाचे शेजारिल बंद असलेले दुकाण भाडयाने मिळाल्याने दि. १५/०६/२०२१ रोजी दुकाण ताब्यात घेवुन त्यांचे इतर साथिदारांना बोलावुन घेवुन दि.**

**१७/०६/२०२१ चे रात्रीतुन सदरचा गुन्हा केला होता. सदर प्रकरण शांत झालेवर ते काही दिवसांनी परत येवुन सांगवी परिसरातील पाहुन ठेवलेल्या दुकानात याच प्रकारे चोरी करण्याच्या विचारात होते.**

तसेच आरोपींकडे केलेल्या तपासात गणेश शाही व शंकरचंद्र लामा या दोघांनी त्यांचे इतर साथिदारांसह दि. ३०/०५/२०२१ रोजी मुरबाड जि.ठाणे येथे स्थानिक वॉचमन चे मदतीने एका बँकेचे शटर कापुन चोरी केल्याचे उघड झाले असुन त्याबाबत मुरबाड पोलिस ठाणे येथे गु.र.नंबर-२२१/२०२१ भा.द.वि. कलम ४५४,४५७,३८० अन्वये गुन्हा दाखल आहे.

**सदर आरोपींची ही एक मोठी टोळी असुन अटक आरोपी नामे गणेश विष्णु शाही व पाहिजे आरोपी नामे शंकर चंद्र उर्फ कांचा लामा, रा- नेपाळ हे दोघे मुख्य आरोपी असुन त्यांनी यापुर्वी याच पद्धतीने अनेक गुन्हे केलेले आहेत. गणेश शाही याचेवर घरफोडीचे व दरोड्याच्या प्रयत्नाचे एकुण १२ गुन्हे, प्रेम टमाटा याचे विरुद्ध ०४ गुन्हे दाखल असुन पाहिजे आरोपी नामे शंकरचंद्र लामा ऊर्फ कांचा याचेवर एकुण ०५ गुन्हे दाखल आहेत.तसेच सदर आरोपी हे अत्यंत धुर्त व चलाख असुन ते नेहमी फेसबुक मॅसेंजर चा वापर करुन एकमेकांना ऑडिओ व व्हिडिओ कॉल करतात.**

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश साो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे साो, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा. पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. प्रशांत अमृतकर (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनाथ बाबर सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, दादा पवार, नारायण जाधव, पोहवा/ प्रविण दळे, संजय गवारे, अदिनाथ मिसाळ, राहिदास आडे, संतोष असवले, तुषार शेटे, पोना/ लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, सुरेश जायभाये, पोशि/ प्रशांत सैद, तुषार काळे, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, आणि तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, स.पो.नि. सागर पानमंद, राजेंद्र शेटे, नागेश माळी, विकास आवटे, पोपट हुलगे यांनी केली आहे.**

**(सुधीर हिरेमठ) भा.पो.से**
पोलीस उप-आयुक्त
गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड